# वणी नगर परिषद कार्यालय

जिल्हा यवतमाळ

फोन नं. - 07239 – 225162 ई-मेल - wani.mc@gmail.com

क्रमांक – नपव/नि.वि./ 328 / २६ दिनांक - १५/०५/२०२६

## सविस्तर ई- निविदा सुचना

मुख्याधिकारी, नगर परिषद वणी, जिल्हा यवतमाळ यांचे वतीने खालील कामांच्या बी-1 दोन लिफाफा पध्दतीने कंत्राटदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे. वरील कामांची निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाच्या आहे. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) दिनांक 18/05/2026 पासुन पाहण्यास उपलब्ध आहे. कामाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत (रु.) | अनामत रक्कम (रु.) | निविदा फॉर्म किंमत (रु.) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी अंतर्गत (पहीली वेळ) | | | | | |
| 1. | वणी नगर परिषद अंतर्गत वणी येथे स्पोर्ट कॉम्पलेक्स तयार करणे. | 5,63,70,990/- | 2,81,854/- | 2500/- | आदेशापासुन 10 महिने |

### ई -निविदा प्रसिध्दीचा तपशिल

| | |
|---|---|
| ई -निविदा विक्री | दिनांक 18/05/2026 ते दिनांक 28/05/2026 |
| निविदा पुर्व बैठक | दिनांक 21/05/2026 रोजी दुपारी 12.00 वाजता मुख्याधिकारी न.प. वणी यांचे दालनात |
| ऑन लाईन निविदा सादर करणे व ऑनलाईन निविदा शुल्क व अनामत भरणा करणे | दिनांक 18/05/2026 ते दिनांक 28/05//2026 |
| ऑन लाईन निविदा उघडणे | शक्य झाल्यास दिनांक 01/06/2026 सकाळी 11.00 वाजता किंवा त्यानंतर. |

| | | | |
|---|---|---|---|
| (सौ. विद्या खेमराज आत्राम) | (राकेश लक्ष्मण बुग्गेवार) | (लक्ष्मण महादेवराव उरकुडे) | (डॉ. सचिन गाडे) |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सभापती | मुख्याधिकारी |
| नगर परिषद वणी | नगर परिषद वणी | नियोजन व विकास समिती | नगर परिषद वणी |

## अटी व शर्ती :-

१. निवीदेच्या अटी व शर्ती सविस्तर निवीदा सुचना महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

२. निवीदेची पुढील सर्व कार्यवाही व शुद्धीपत्रके महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवरच उपलब्ध राहतील.

३. कंत्राटदाराने लिफाफा पाकीट क्र. १ (तांत्रिक लिफाफा) व लिफाफा क्रं. २ (आर्थीक लिफाफा) मध्ये सादर करावयाची कागदपत्रे व सदर निविदा सुचने संदर्भातील विस्तृत अटी व शर्ती सदर निवीदा सुचने सोबत जोडण्यात आलेल्या ई-निवीदा कागदपत्रामध्ये नमुद करण्यात आलेल्या आहेत.

४. कंत्राटदाराने भारत सरकार/महाराष्ट्र शासन/ महानगरपालीका/नगर परिषद/जि.प./सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गतचे 'Sports Infrastructure/Supply Works/Green Gym/ Cross Fit Gym' विकसीत केल्याचे कामाचा अनुभव आवश्यक आहे.

५. कंत्राटदाराने निविदा भरण्यापुर्वी काम करावयाच्या ठिकाणाची नगर परिषद अभियंता यांचे सह प्रत्यक्ष पाहणी करून जिओ टॅगींग फोटो व अभियंता यांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे अनिवार्य आहे. यासंबंधी कंत्राटदाराचा कोणताही उजर वा आक्षेप ऐकला जाणार नाही.

६. कंत्राटदाराने B1 निविदा प्रपत्रा मधिल 3.6.25 Annexure: List of Sample Equipment to be Submitted मध्ये दर्शविलेल्या बाबींचे नमुने निविदा भरण्याचे अंतिम दिनांकापुर्वी सादर करुन प्रमाणपत्र घेणे व ते निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे.

७. निवीदा फार्म किंमत व इसारा रक्कम हि http://mahatenders.gov.in हया वेबसाईटचा पोर्टल सुविधाद्वारे ऑनलाईन नेट बँकिंग/(SBI) द्वारेच जमा केली जाईल.

८. न.प.कार्यालयात कोणत्याही निवीदा फार्म/PDF स्वरुपातील कागदपत्रे/निवीदा /अर्ज /निवीदा किंमत/इसारा रक्कमेचा डि डी स्विकारला जाणार नाही. ऑनलाईन सुविधेद्वारे सर्व कागदपत्रे/रक्कम जमा करण्यात यावे.

९. शासनाकडुन वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या शासन निर्णयाचे पालन करणे सबंधित मंजुर निवीदाधारकांना बंधनकारक राहिल.

१०. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग दिनांक २७/०९/२०१८, २६/११/२०१८, १४/०१/२०१९, २९/०१/२०१९ व इतर प्रमाणे संपुर्ण तरतुदी लागु राहतील त्याचे अनुषंगीक सुधारणे नुसार अन्वये संपुर्ण कार्यवाही करावी.

११. ई-निवीदा सुचनेत दर्शविण्यात आलेल्या कंत्राटी कामाचे मंजुर निवीदाधारकास कामाचे कंत्राट रक्कम अनुक्रमे रुपये ५ लक्ष किंमती पर्यंत करीता कार्यकरार (करारनामा) शासकिय मुद्रांक रूपये ५००/- व ५ लक्ष रूपये पेक्षा वरील प्रत्येकी ०१ लक्ष रूपये किमतीसाठी किंवा त्यांच्या भागासाठी रूपये ३००/-असे प्रमाणात आकारण्यात येईल.

१२. प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दराच्या असेल तर L1 ठेकेदारांनी निविदाधीन किंमतीच्या १% एवढ्या रकमेचा धनाकर्ष (Demand Draft)/FDR परफॉरमंस सिक्युरीटी कार्यालयास सादर करावा (उदा १ % ते १०% कमी दर - १% रक्कम)

१३. प्राप्त निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे तेवढ्या रकमेचा व वरील बाब - ७ प्रमाणे येणा-या रकमेसह एकत्रित धनाकर्ष (Demand Draft)/FDR सादर करावे लागेल. (उदा. १५ % कमी दर - १०% पर्यंत करिता - १ टक्का व (१५% - १०%) - ५ % असे एकूण ६ %)

१४. देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरित रकमेसाठी दोन पटीने रक्कम DD/FDR द्वारे सादर करणे अनिवार्य राहील. उदा. १९% कमी दर -(१९-१५=४% X २ = ८ %) एकूण १+५+८ =१४%

१५. वरील बाब क्र. 12,13 व 14 प्रमाणे DD/FDR निविदा स्विकृतीच्या दिनांकापासुन ८ दिवासांत कार्यालयास सादर करावा लागेल. विहीत कालावधीत परफॉरमन्स सुरक्षा रक्कम सादर न केल्यास या नंतर आपला देकार विचारात घेतला जाणार नाही.

१६. करारनामा करतेवेळी २ टक्के सुरक्षा रक्कम जमा करावी लागेल तसेच बिलातुन ८ टक्के सुरक्षा रक्कम तसेच नियमाप्रमाणे आयकर व त्यावरील अधिभार, कार्यकंत्राट कर, व इतर अनुज्ञेय कर कपात करण्यात येईल सुरक्षा अनामत शासन निर्णयानुसार कामाचा दोष दायीत्व कालावधी हा 10 वर्ष राहील. काम पुर्ण झाल्यानंतर काम सुस्थितीत असल्याबाबत खात्री केल्यानंतर परत करण्यात येईल.

१७. कामाचे बिल सादर करतांना बांधकामाअंतर्गत गौण खनिज वापराचे स्वामीत्व धन मोकळे केल्याचे प्रमाणपत्र अधिकृत प्राधिकरणाकडुन सादर करणे निवीदाधारकाची जबाबदारी राहिल अन्यथा गौण खनिजापोटी स्वामीत्वधनाची रक्कम देय बिलातुन कपात करुन शासनास भरणा करण्यात येईल.

१८. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्वच निवीदा नाकारण्याचा अधिकार मा. मुख्याधिकारी , नगर परिषद वणी यांनी राखुन ठेवलेला आहे.

१९. खोदाईचे व न वापरात येणारे मटेरिअल त्वरीत उचलावे वाहतुकीस अडथळा होणार नाही याची काळजी घ्यावी.

२०. सदर काम पुर्ण करून देण्याचा कालावधी हा कार्यादेशाच्या दिनांका पासुन 10 महिने चा असुन त्यापेक्षा जास्त विलंब झाल्यास प्रतिदिन १००० रु. दंड लावण्यात येईल. याची गांभीर्याने नोंद घ्यावी .

२१. महाराष्ट्र नगर पालिका लेखा सहिंता २०१३ चे तरतुदी प्रसिद्ध निवीदासुचनेस अनुसरून नमुद केलेल्या कामासाठी लागु राहिल.

२२. कंत्राटदार स्वीकारलेले काम करतांना बांधकामाचे साहित्य मटेरियल यांचा सार्वत्रिक रहदारीस किंवा दैनंदिन कामास अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी प्रसंगी अपघात, कामाच्या साहित्य सुरक्षीततेचा सर्वश्री हमी किंवा तत्संबंधातील उपाययोजनाची जबाबदारी कंत्राटदारावर राहिल. तसेच शासकिय विमा निधी महाराष्ट्र राज्य यांच्या कडे कंत्राटदार कामाचा विमा काढुन विम्याचे कागदपत्र मुख्याधिकारी यांना सादर करील किंवा तसे न केल्यास तद्वसंबधातील सर्व परिणामास कंत्राटदार स्वत: जबाबदार राहिल.

२३. आदेश मिळालेपासुन विहीत मुदतीचे आत काम पुर्ण करण्याची जबाबदारी करारनामा लिहुन देणार म्हणजेच अभिकरण्याची राहिल.

२४. कामाकरीता वापरण्यात येणारे घटक साहीत्य व मटेरियलची प्रत, गुणात्मक दर्जा चांगले नसल्याचे न.प.चे निर्देशनास आल्यास असे मटेरियल साईड वरुन तात्काळ बाहेर नेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. मटेरियल तपासणी कंत्राटदार स्वखर्चाने निर्देशित प्रयोग शाळेमधुन करुन त्याची खात्री पटवुन देईल.

२५. कोणतेही काम कंत्राटदाराने पुर्ण केल्यानंतर कामाची पुर्णपणे तपासणी करूनच १५ दिवसानंतर कामाचे देयक सादर करण्याची कार्यवाही करण्यात येईल. कामाचे निरीक्षण मुख्याधिकारी नगर परिषद यांचेकडुन करून झाल्यानंतर कामाचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र नमुना ६२ मध्ये दिल्यानंतरच बिल अदायगी केली जाईल.

२६. कामास सुरवात केल्यानंतर काम अर्धवट व थोडेफार करुन सयुक्तीक कारणाशिवाय तसेच पाडुन ठेवल्याचे निर्देशनास आल्यास कंत्राटदाराची निवीदा व कंत्राट रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांना राहिल व जेवढे काम झाले आहे किंवा मटेरियल/साहित्य लावण्यात आलेले आहे याबाबतचे देयक देण्यात येणार नाही व मौका स्थळी टाकण्यात आलेले साहित्य जप्त करण्यात येईल.

२७. कामाचे आर.ए.बिल देणे किंवा न देणे कामाचे प्रगतीनुसार ठरविण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांचेकडे सुरक्षीत राहतील.

२८. करारनामा लिहुन देणार कंत्राटदार प्रस्तुत लोकोपयोगी विकास काम विहीत मुदतीत पुर्ण करुन न दिल्यास वरील अट क्रं.१२ नुसार विलंब दंड आकारणीस पात्र राहिल व सदरचे विलंब दंड रक्कम अनामत रकमाच्या ठेवी/ देयकामधुन कपातीस पात्र ठरतील.मात्र कंत्राटदाराच्या कामास काही सयुक्तीक कारणामुळे जसे नैसर्गीक आपत्ती किंवा इतर ग्राहय कारणे दर्शवुन मुख्याधिकारी यांचेकडे तसे मुदतवाढी संबधात अर्ज कामाचा कालावधी संपुष्टात येण्यापुर्वी कमीत कमी सात दिवसा पुर्वी सादर करुन मुख्याधिकारी यांचे समाधान होत असल्यास मुदतवाढ संबंधात यथोचीत कार्यवाही करण्यात येइल.

२९. न.प.निधी किंवा शासन निधी अंतर्गत काम असल्यास सबंधित निधी न.प.कडे जमा झाल्यासच त्याकामाचे देयक शोधन करण्यात येईल. देयक प्रलंबीत राहिल्यास प्रलंबीत देयकास अनुसरुन कोणत्याही व्याजाची रक्कम न.प.कडुन दिली जाणार नाही किंवा कंत्राटदाराचा कोणताही उजर/आक्षेप राहणार नाही असे कंत्राटदार मान्य करीत आहे.

३०. कंत्राटी कामाचे पाठपुरावा प्रत्यक्ष कंत्राटदार करील किंवा कंत्राटदाराने प्राधिकृत केलेल्या प्रतिनीधी कडुनच करण्यात येईल. त्याशिवाय इतर कोणत्याही इसमास न.प.शी संपर्क साधता येणार नाही.

३१. कामाबाबत कोणत्याही तांत्रिक बाबी सबंधात मुख्याधिकारी किंवा अभियंता यांना शंका असल्यास त्याची खात्री पटविण्यासाठी तांत्रिक तपासणी (Third Party Technical Audit) करण्यास प्राधिकरणकडुन कार्यवाही करण्यात येईल.

३२. प्रस्तुत कंत्राटी कामाचे संविदेमध्ये नगर परिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही हिस्सा किंवा हितसबंध किंवा कंत्राटदाराची भागीदारी नाही असे कंत्राटदाराकडुन अभिवचन देण्यात येत असुन यामध्ये कसुर आढळल्यास नियमाप्रमाणे कंत्राटदार किंवा सबंधित न.प.सदस्य कार्यवाहीस पात्र ठरेल.

३३. अंतिमरीत्या पुर्ण झालेल्या कामाचे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र सक्षम अधिका-यांनी दिलेल्या नंतर आणि कामाच्या देयकाची अदायगी कार्यवाही नंतर सदर कामाचा दोषदायीत्व निवारण कालावधी (५ वर्ष) पुर्ण झाल्यानंतरच करार समाप्ती झाल्याचे मानण्यात येईल.

३४. प्रचलीत किमान वेतन कायदा १९४८ व इतर कामगार कायद्याने पालन करणे कंत्राटदाराला बंधनकारक राहिल तसेच मा.सहा.आयुक्त भविष्य निर्वाह निधी EPF पंजीयन सादर करणे आवश्यक राहिल.

३५. सदरहु कामाबाबत कुठलाही वाद उद्भभवल्यास मुख्याधिकारी यांचा निर्णय अंतिम असेल.

३६. नगर परिषद क्षेत्रातील काम करतांनी निघालेले साहित्य न.प.ला विचारुन इतरत्र वाहतुक करावी अन्यथा अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार देयकातुन कपात करण्यात येईल.

३७. कामाचे ठिकाणी खोदकाम, खड्डा तसेच वाहतुकीचे ठिकाणी सर्व सुरक्षा विषयक व्यवस्था व रात्रीचे वेळी दिवाबत्ती करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. साईटवर सुरक्षा व्यवस्था न केल्यामुळे कोणताही अपघात अथवा घटना झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३८. मंजुर कामाच्या बांधकामाकरीता नगर परिषद कोणत्याही प्रकारचे साहित्य कंत्राटदारास पुरविले जाणार नाही. साहित्य पुरविल्यास नगर परिषदेने ठरविलेल्या दरानुसार देयकातुन कपात करण्यात येईल.

३९. मुख्याधिकारी किंवा नगर परिषद अभियंता यांनी वेळोवेळी काम चालु असतांना दिलेल्या सुचनांचे व आदेशाचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहिल.

४०. सदर कामाचे अंदाजपत्रक हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या दर सुचिनुसार बनविण्यात आले असुन कंत्राटदाराने अंदाजपत्रकातील विविध बाबींचे दर तपासुनच निवीदा भरावी. Price Escalation आणि शासकिय दरसुची मधिल दरफरक वाढीव बाजारभावा प्रमाणे मिळणार नाही व याबाबत कंत्राटदाराची कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

४१. कोणत्याही कारणास्तव कामात हेळसांडपणा केल्यास व अपुर्ण काम सोडुन दिल्यास कंत्राटदारांचा कंत्राट रद्द करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांना राहिल व नगर परिषदेची कोणतेही काम यापुढे देण्यात येणार नाही.

४२. काम चालु असतांना मुळ कामात अंशत: प्रकारचा बदल करण्याचा अधिकार मुख्याधिकारी व अभियंता यांना राहिल. परंतु मोठया स्वरूपात बदल करावयाचा असल्यास नगर परिषदेची आणि दिलेल्या मार्गदर्शकसूचना याचे नुसार मंजुरी आवश्यक असेल.

४३. कामाच्या बांधकामाबाबत वा यापुर्वी केलेल्या इतर बांधकामाबाबत लेखा परिक्षणात कोणत्याही प्रकारचे वसुलीचे आदेश असल्यास ती संपुर्ण रक्कम मी करीत असलेल्या बांधकामाचे बिलातुन वसुल करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांना राहिल. अपेक्षीत रक्कम (वसुल) अपुरा पडत असल्यास ती संपुर्ण रक्कम महाराष्ट नगर पालिका अधिनियम १९६५ मधिल तरतुदी नुसार वसुल करून घेण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांना राहिल.

४४. सदर कामाबाबत काही वाद निर्माण झाल्यास सदरचा वाद वणी न्यायालयाचे न्याय कक्षेत सोडविणे बंधनकारक राहिल.

४५. सदर कामाची निवीदा प्रक्रीया सूरू असतांना किंवा सदर प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर वेळोवेळी निर्गमीत होणारे शासन निर्णय सदर कामास लागु राहतील.

४६. परीस्थीतीनुसार आवश्यकत्याअटी व शर्ती बदलविण्याचे अधिकार मा.मुख्याधिकारी यांनी राखुन ठेवले आहेत.

सही/-
मुख्याधिकारी
नगर परिषद ,वणी

# वणी नगर परिषद कार्यालय

जिल्हा यवतमाळ

फोन नं. - 07239 – 225162 ई-मेल - wani.mc@gmail.com

क्रमांक – नपव/नि.वि./325 /२६ दिनांक - १५/०५/२०२६

प्रति,

संपादक /वार्ताहर

दै. लोकमत टाईम्स, दै. हितवाद, दै. भास्कर, दै. लोकमत, दै. लोकसत्ता, दै. नवभारत, दै. विदर्भ मत[illegible]

विषय :- ई- निवीदा सुचना प्रसिद्ध करणेबाबत.

सोबत जोडलेल्या ई-निवीदा सुचना आपल्या दैनिक वृत्तपत्रात फक्त एकदाच दिनांक 18 /05/2026 च्या अंकामध्ये कमीत कमी जागेत दर्शनी ठिकाणी प्रसिद्ध करून त्याबाबतचे बिल शासकिय दराने वृत्तपत्राच्या अंकाच्या ३ प्रती सह भुगताना करीता कार्यालयात सादर करावे.

मुख्याधिकारी
नगर परिषद, वणी

**नगर परिषद वणी जि. यवतमाळ**

**ई-निवीदा सुचना**

क्र. नपव/निवि/निविदा/ 324 /2026 दिनांक.......15 /05/2026

मुख्याधिकारी नगर परिषद वणी,जिल्हा-यवतमाळ यांचे कडून जिल्हा खनिज प्रतिष्ठान, यवतमाळ निधी अंतर्गत **वणी नगर परिषद अंतर्गत वणी येथे स्पोर्ट कॉम्पलेक्स तया करणे अंदाजत्राकीय किंमत रु. 5,63,70,990/-** चे कामाची ई-निवीदा बि-१ दोन लिफाफा पद्धतीने कंत्राटदाराकडुन ई-निवीदा मागविण्यात येत आहे. वरील कामाची निवीदा केवळ ई-निवीदा पद्धतीने सादर करावयाची आहे. निवीदेचा विस्तुत नमुना महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईडवर) दिनांक ---18---/05/2026 ते -----28-/05/2026 पर्यंत पहावयास व भरावयास उपलब्ध आहे. शुद्धीपत्रके केवळ ऑनलाईनच प्रसिद्ध केले जातील .

| | | | |
|---|---|---|---|
| (सौ. विद्या खेमराज आत्राम) | (राकेश लक्ष्मण बुग्गेवार) | (लक्ष्मण महादेवराव उरकुडे) | (डॉ. सचिन गाडे) |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सभापती | मुख्याधिकारी |
| नगर परिषद वणी | नगर परिषद वणी | नियोजन व विकास समिती | नगर परिषद वणी |

Signature Not Verified
Digitally signed by HARSHAL RAHUL UPARWAT
Date: 2026.05.17 19:04:03 IST
Location: Maharashtra-MH